
मनोगत । लक्ष्मीकांत देशमुख

# प्रशासकाने 'आऊट ऑफ बॉक्स' विचार केला पाहिजे

साधनसंपत्तीने संपन्न असलेला कोल्हापूर जिल्हा गेल्या काही वर्षांत स्त्रीभ्रूण हत्या समस्येबाबत मात्र महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर होता. त्यामुळे लक्ष्मीकांत देशमुख यांनी कोल्हापूरच्या जिल्हाधिकारीपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर या प्रश्नाकडे विशेष लक्ष दिले आणि प्रशासन गतिमान केले. हे करताना त्यांनी एका बाजूला प्रबोधन मोहीम आखली आणि दुसऱ्या बाजूला स्त्री-भ्रूण हत्येला जबाबदार असणाऱ्या संबंधित घटकांना जरब बसेल अशी कारवाई सुरू केली. त्यांनी राबवलेल्या 'सेव्ह द बेबी गर्ल, सेव्ह द नेशन' अभियानामुळे महिलांचा कमालीचा घटलेला जन्मदर चांगला सुधारला. म्हणजे अवघ्या एका वर्षात स्त्रियांचा जन्मदर ८३९ वरून ९०१ पर्यंत गेला.



‘आम्ही सावित्रीच्या लेकी तुमच्या ‘सेव्ह द बेबी गर्ल’मुळे पुन्हा एकदा मोकळेपणाने श्वास घ्यायला लागलो आहोत!’ कोल्हापूर जिल्ह्यातील एका ग्रामीण भागात राहणाऱ्या गृहिणीचं हे मला नववर्षानिमित्त शुभेच्छापर आलेल्या पत्रातलं मनोगत.

‘साधना’ दिवाळी अंकातील माझा लेख वाचून डोंबिवलीहून एका गृहस्थांचा मला काही दिवसांपूर्वी फोन आला होता. ते गृहस्थ म्हणत होते, ‘मी माझ्या मुलाचं नाव तीन-चार वधू-वर सूचक मंडळांत विवाहासाठी नोंदवलं आहे, पण तेथे मुलींच्या स्थळांचं प्रमाण मुलांच्या स्थळांच्या तुलनेत ५० टक्केच जेमतेम आहे.’ ते पुढे असंही म्हणाले की, ‘आज सामान्य प्रतीच्या मुलांचं लग्न होणं दिवसेंदिवस कठीण होत चाललंय, कारण कमी मुली असल्यामुळे त्यांना चांगला चॉइस आहे व मागणीही आहे...’ मी त्या फोननंतर कितीतरी वेळ सुन्नपणे विचार करीत बसलो होतो.

कोल्हापूर जिल्ह्यात जिल्हाधिकारी म्हणून, इथं सर्वांत कमी मुलींचं प्रमाण - सेक्स रेशो असल्यामुळे मी ‘सेव्ह द बेबी गर्ल - सेव्ह द नेशन’ हा आय.सी.टी. प्रणित उपक्रम गेले दीड वर्ष राबवतो आहे. त्याला चांगल्या प्रमाणात यश मिळतंय, पण त्याहून मोठं यश म्हणजे केवळ जिल्ह्यात नव्हे राज्यातही या ढासळत्या मुलींच्या समस्येबाबत जनजागृती झाली आहे. एकूणच समाजाला चिंता वाटतेय, हे डोंबिवलीच्या गृहस्थाच्या फोननं प्रातिनिधिक स्वरूपात दिसून येतं, तर स्त्रियांना माझी मोहीम म्हणजे त्यांचा श्वास पुन्हा मोकळा होतोय असं वाटतंय. माझ्यासाठी एक ब्यूरोक्रॅट-एक प्रशासक म्हणून समाधानाची बाब आहे.

आज विविध घोटाळ्यांमुळे नववर्षात समाजात सर्वत्र एक खदखद व असंतोष आहे. नव्या मुख्यमंत्र्यांनी, नोकरशहा, राजकारणी व बिल्डर्सची अभद्र युती झाली असून तिनं मुंबई विकायला काढल्याचं परखड मत नुकतंच व्यक्त केलंय. त्यामुळे आज समाजाच्या लेखी नोकरशहांची व एकूणच ब्यूरोक्रसीची प्रतिमा पार मलिन झाली आहे. मी त्या समाज घटकांचा प्रतिनिधी आहे. मलाही सहकारी अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचार, दप्तर दिरंगाई आणि बेपर्वाईची खंत नव्हे तर शरम वाटते. काही महिन्यांपूर्वी नारायण मूर्ती यांनी ‘आय.ए.एस.’ सेवा बंद करून ‘प्रोफेशनल सर्व्हिसेस’ सुरू करा, असं खळबळजनक विधान केलं होतं, त्याचा प्रतिवाद करणारा लेख मी माझ्या ‘बखर - भारतीय प्रशासनाची’ या ‘साधना’च्या लेखमालेत लिहिला होता. पण मागील ४ महिन्यांत भारतात व महाराष्ट्रात ज्या घोटाळ्यांची मालिका उघडकीस आली, त्या पार्श्वभूमीवर मी आज खरंच संभ्रमित आहे, सचिंत आहे.

अशा वेळी एक ब्यूरोक्रॅट - एक प्रशासक म्हणून मी काय करू शकतो? काय भूमिका घेऊ शकतो? मला वाटतं, मी अधिक चांगलं काम करून, लोकाभिमुख - स्वच्छ प्रशासन देऊन हे दाखवून देऊ शकतो की, एकूणच प्रशासकीय चौकट बिघडलेली नाहीये. आजही मोठ्या प्रमाणात कर्तव्यनिष्ठेने काम करणारे अधिकारी-कर्मचारी आहेत; ते एका अर्थानं ‘अनसंग हीरोज’ आहेत. कार्यक्षम व स्वच्छ प्रशासनाचा पेला पुरता भरलेला नाहीये, हे मान्यच करावं लागेल. पण तो पुरता खाली नाही, हेही मला नम्र पण ठामपणे सांगावंसं वाटतं. नाही तर ही यंत्रणा संपून गेली असती. इथं मला ‘उपयुक्तता वादाच्या’ सिद्धांताची वाचकांना आठवण करून द्यावीशी वाटतेय. जी बाब समाजासाठी उपयुक्त नाही, ती कालौघात संपून जाते. पण ब्यूरोक्रसीची अपरिहार्यता आजही कायम आहे, तिचा रेलेव्हन्स अबाधित आहे. कारण आज कल्याणकारी प्रशासनाच्या कामाची व्याप्ती प्रचंड वाढली आहे. तिची जगभर डिलिव्हरी सिस्टिम ही ब्यूरोक्रसीच आहे. त्यामुळे ती कशी सक्षम, स्वच्छ व जबाबदेही होईल किंवा करता येईल हा खरा सवाल आहे. अमेरिका-ब्रिटन आदी देशांनी मागील ३०-४० वर्षांत अनेक मूलभूत प्रशासकीय सुधारणा घडवून आणल्या, मात्र भारतात केवळ मलमपट्टी स्वरूपाचे बदल झाले. त्यामुळे ब्रिटिशकालीन पद्धत व दृष्टिकोन असलेली ब्यूरोक्रसी घेऊन आज देश प्रगतिपथावर हव्या त्या वेगानं जाऊ शकणार नाही, त्यामुळे या कळीच्या प्रश्नाला सरकार हात घालील तो सुदिन!

पण आजची प्रशासकीय व्यवस्था पुरेशी शक्तिशाली व प्रभावी आहे. दृढनिश्चयी व कल्पक प्रशासक दिलेल्या चौकटीतही खूप काही करू शकतो, बदल घडवून आणू शकतो. कर्नाटक सरकारच्या नागरिकांना ७/१२ देणाऱ्या ‘भूमी’ योजनेचे जनक चावला नामक एक आय.ए.एस. अधिकारीच होते हे विसरून चालणार नाही. नक्षलवादी समस्येवर मात करणारे महेश भागवत हेही भारतीय पोलिस सेवेचे अधिकारी आहेत हे विसरून कसं चालेल?

मी स्वत: कोल्हापुरात ‘सेव्ह द बेबी गर्ल’ उपक्रम वेगानं घसरणाऱ्या स्त्रियांचं प्रमाण पहिल्या टप्प्यात रोखण्यासाठी व मग ते वाढवण्यासाठी आऊट ऑफ बॉक्स विचार करीत आय.सी.टी.प्रणित उपक्रम सुरू करून प्रशासक काय करू शकतो हे माझ्या परीनं दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. गर्भाचं लिंगनिदान करू नये असं पी.सी.पी.एन.डी.टी. हा कायदा सांगतो, पण वाढत्या प्रमाणातील सोनोग्राफी सेंटर्समुळे (त्याची उपयुक्तता रोगनिदानासाठी व गर्भाच्या वाढीची-विकृतीची तपासणी करण्यासाठी महत्त्वाची असली तरी त्याद्वारे गर्भ जर १२ आठवड्यांचा झाला तर त्याचं लिंगनिदान सोनोग्राफी टेस्टच्या वेळी करता येतं) गर्भातील बाळाचं लिंग जाणून घेऊन ते जर मुलीचं असेल तर सर्रास गर्भपात घडवून

आणला जातो. १९९१ पासून देशभर सोनाग्राफी सेंटर्सचं पेव फुटलंय आणि देशातील स्त्रियांचं प्रमाण झपाट्यानं कमी होतंय. पण त्यावर प्रतिबंध करायला हा कायदा सक्षम ठरलेला नाहीये. कारण गेल्या १० वर्षांत मोजक्याच डॉक्टर्सवर कार्यवाही झाली आहे. म्हणून मी सर्व सोनोग्राफी केंद्रे ऑनलाईन केली व माझ्या 'सेव्ह द बेबी गर्ल डॉट कॉम' या संकेतस्थळाला जोडली व प्रत्येक सेंटरवर होणाऱ्या प्रत्येक सोनोग्राफीच्या टेस्टची संपूर्ण माहिती ऑनलाईन भरण्याची डॉक्टर्सवर सक्ती केली. त्यामुळे डॉक्टर्सवर सूक्ष्मनियंत्रण - क्लोज मॉनिटरिंग - करता येऊ लागलं. दुसऱ्या टप्प्यात 'सायलेंट ऑब्झर्व्हर' हे मशीन सर्व सोनोग्राफी मशिनला बसवलं, जे सोनोग्राफी टेस्टचा व्हीडिओ कॅप्चर करतो, जे जिल्हाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, म.न.पा. आयुक्त पाहू शकतात, तपासू शकतात. त्यामुळे लिंगनिदान करणाऱ्या डॉक्टर्सवर एक वचक-धाक (डिटरंट) निर्माण झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यात आता सोनोग्राफी सेंटर्सवर लिंगनिदान करणं ९९% थांबलं आहे, तसंच मुलींचं प्रमाण वाढत आहे. ८३९ वरून ९०१ पर्यंत हे प्रमाण मॅटर्निटी होमच्या प्रसूतीच्या आकडेवारीवरून वाढलेलं दिसतं. मुख्य म्हणजे डॉक्टर्समध्ये ही जाणीव दृढमूल झाली आहे की, आता जिल्ह्यात लिंगनिदान झाले तर ते डॉक्टर्स पकडले जाऊ शकतात. या वर्षभरात २० डॉक्टर्सनी सोनोग्राफी सेंटर्स बंद केली आहेत, हे याचं द्योतक आहे.

अर्थात हे करणं मुळीच सोपं नव्हतं. कारण समाजात मुलांचा आग्रह व मुलीचा जन्म म्हणजे संकट, हुंडा-लग्न व शिक्षणाचा वाया जाणारा खर्च ही भावना आजही मोठ्या प्रमाणात आहे. तसेच डॉक्टर्सनाही मिळणारा अव्वाच्या-सव्वा पैसा, त्यामुळे त्यांचाही हा अवैध धंदा बंद होत असल्यामुळे विरोध होताच. बैठका, कार्यशाळा घेऊन प्रबोधन, थोडा धाक, बराचसा आदर आणि मुख्य म्हणजे प्रशासनाची तळमळ व या दुर्लक्षित प्रश्नाबाबतची बांधिलकी यामुळे सर्व डॉक्टर्सनी संमती दिली. गेले वर्षभर हा प्रयोग चालू आहे. अनेक जिल्ह्यांत तो सुरू झाला आहे व लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात तो लागू करण्याची घोषणा व निर्णय आरोग्यमंत्र्यांनी जाहीर केला आहे.

जनमानसातली अधिकारी-राज्यकर्त्यांची प्रतिमा (परसेप्शन) ही एका अर्थाने वास्तवता (रिॲलिटी) मानली पाहिजे. एक प्रशासकीय अधिकारी म्हणून माझी जनमानसातली प्रतिमा माझं काम, माझं वागणं-बोलणं आणि समाजातील वावर यावर ठरत असते, ती व्यापक अर्थाने वास्तवता असते.

कोल्हापुरात मी रेशनधान्याचा काळाबाजार रोखण्यासाठी सुरू केलेली एस.एम.एस. सेवा असो, रॉकेल टँकर्सवर बसवलेली व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टिम (जी.पी.एस. प्रणित) असो वा प्रत्येक तलाठ्याला 'ई-चावडी' अंतर्गत दिलेला लॅपटॉप-प्रिंटर असो, या द्वारे मी अधिक स्वच्छ व लोकाभिमुख प्रशासन देण्याचा प्रयत्न करून अधिकारीही प्रथम माणसे असतात, तेही संवेदनशील असतात व त्यांची नाळ जनतेशी रुजलेली असते हे दाखवून देत मी प्रशासनाची प्रतिमा माझ्या परीनं सुधारण्याचा प्रयत्न करतो.

भारतात आजही चांगल्या अधिकाऱ्याला नागरिक प्रतिसाद देतात, हे मी अनुभवलं आहे. सांगलीमध्ये जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी असताना लोकवर्गणीतून चारशे शाळांना तीन-तीन संगणक व शैक्षणिक सी.डी.ज गुणवत्तावाढीसाठी दिल्या, तर कोल्हापुरात या वर्षी लोकांच्या मदतीनं 'बालसंकुल' या अनाथ मुलांसाठी काम करणाऱ्या संस्थेच्या व 'स्वयम्' या मतिमंद मुलांसाठी काम करणाऱ्या शाळांच्या सुमारे पाच कोटी किमतीच्या इमारतीच्या बांधकामाचा संकल्प सोडलाय. तो मला पूर्ण करायचा आहे. मला त्याबद्दल पूर्ण खात्री आहे, नव्हे आजवर निम्म्या रकमेची वचने मला मिळाली आहेत. 'सेव्ह द बेबी गर्ल'चा पुढला टप्पा म्हणून जन्मलेल्या मुलींचं समाजानं स्वागत केलं पाहिजे यासाठी मी 'लखपती माझी कन्या' ही योजना जाहीर केली आहे. प्रत्येक ग्रामपंचायत व नगरपरिषदेनं प्रत्येक दारिद्र्यरेषेतील कुटुंबामध्ये जन्मलेल्या मुलीच्या नावाने रु. सहा हजार द्यावेत, त्यात तिला चाळीस हजारांचं विमा संरक्षण व साठ हजारांची रक्कम वयाच्या अठराव्या वर्षी मिळेल अशी योजना तयार केली आहे. तिलाही उत्स्फूर्त प्रतिसाद आहे. आजवर नऊ नगरपरिषदा व दीडशे ग्रामपंचायतींनी ठराव केले आहेत. हे मी का करू शकलो? एक तर कलेक्टर म्हणून माझा अधिकार व माझ्या प्रामाणिक तळमळीच्या कामाची नागरिकांना वाटणारी खात्री.

शेवटी मी एवढंच म्हणू शकतो की, प्रत्येकानं जगत असताना, काम करताना माणुसकीचा धर्म पाळायचा असतो. आम्हां प्रशासकांना अधिकार व मान्यता असते, म्हणून आम्ही अधिक हिरीरीनं माणूसधर्म पाळत मदतीचा हात विना विलंब काम करून व प्रसंगी आऊट ऑफ बॉक्स विचार करीत केला पाहिजे. तोच मी करतोय, करत राहीन.

**- लक्ष्मीकांत देशमुख**
बी-२, श्रीनिवास गार्डन,
केदारनाथ मंदिराजवळ, मॉडेल कॉलनी,
शिवाजीनगर, पुणे.
Mob. 9325297509
laxmikant05@yahoo.co.in

ओळख । दयानंद कांबळे

# येऊ घातलेल्या जैविक असमतोलाविरुद्धचा लढा

८ मार्च २००९ रोजी कोल्हापुरातल्या राजर्षी शाहू स्मारक येथे जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सभागृह खचाखच भरलेले. महिलांची लक्षणीय गर्दी. महिला सक्षमीकरण, स्त्री-पुरुष समानता अशा आशयांची भाषणे झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख सर्वांत शेवटी भाषणासाठी उभे राहतात. त्यांचे भाषण सुरू होते, ''दर हजारी मुलींचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटत असताना समाज मात्र काहीही बोलत नाही. कोल्हापूर जिल्हा तर मुलींच्या प्रमाणात नीचांकी अवस्थेत आहे. ८ मार्च २०११ साली जागतिक महिला दिनास १०० वर्षे पूर्ण होत आहेत. पुढील दोन वर्षांच्या कालावधीत कोल्हापूर जिल्ह्यातील मुलींचे प्रमाण वाढविण्यासाठी मी जाणीवपूर्वक व संवेदनशील मनाने प्रयत्न करीन.'' त्यांचे हे वाक्य संपताच सभागृहात टाळ्या पडतात. कार्यक्रम संपतो. जिल्हाधिकाऱ्यांचे भाषण खूप छान झाले, परंतु लोकांची मानसिकता बदलणे अवघड आहे. साहेबांनी मुलींचे प्रमाण वाढविण्याचा संकल्प सोडला खरा पण तो प्रत्यक्षात येईल की नाही जरा शंकाच आहे, अशी कुजबूज सभागृहाबाहेर पडताना काही ऐकू येत होती. श्रीमंत म्हणून आणि दरडोई उत्पन्नात अग्रेसर असणारा कोल्हापूर जिल्हा मात्र मुलींची गर्भातच हत्या का घडवून आणतो? या प्रश्नाचे अनेक प्रतिगामी कंगोरे आहेत. कोल्हापूर पुरोगामी म्हणून ओळखले जाते. छत्रपती शाहूंची दूरदृष्टी लाभलेला हा जिल्हा स्त्री-पुरुषांमधील जैविक विषमतेला खतपाणी का घालतो आहे? याला जबाबदार कोण? आदि अनेक प्रश्नांचे थैमान माझ्या मनात आजही आहे. लिंगनिदान करून गर्भातल्या अर्भकाचे लिंग जाणून घेण्याचा अघोरी प्रयत्न करणारे माता-पिता याला जेवढे जबाबदार आहेत तेवढेच लिंगनिदान करणारे डॉक्टर्सही याला जबाबदार आहेत. त्याबरोबरच समाजाने जाणीवपूर्वक जोपासलेली 'वंशाचा दिवा' ही संकल्पनाही याला जबाबदार आहे. ही सर्व आव्हाने पेलून मुलींचे प्रमाण वाढविण्याचे प्रयत्न करणे कठीण काम होते. परंतु जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी स्त्रीभ्रूण हत्येला लगाम लावण्यात अभूतपूर्व असे यश मिळवले. सेव्ह द बेबी गर्ल ही संकल्पना ज्या दिवशी त्यांनी मांडली त्या दिवसापासूनचा मी साक्षीदार आहे. अधिकाऱ्यांच्या बैठका, डॉक्टरांसोबत 'ब्रेन स्टॉर्मिंग सेशन' असो, देशमुखांची तळमळ पदोपदी अनुभवास येत होती. मुळातच साहित्यिक आणि पुस्तकाबरोबरच माणसं वाचण्याची आवड असलेला हा माणूस किती संवेदनशील असेल याची प्रचिती अनेक प्रसंगांतून अनुभवायला मिळाली.

सेव्ह द बेबी गर्ल आणि सायलेंट ऑब्झर्व्हर या दोन उपक्रमांमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील मुलींची संख्या वाढू लागल्याचे दिसून येत आहे. जागतिक पातळीवर हा उपक्रम नावाजला गेला. नॅसकॉम फौंडेशन, ई-इंडिया आणि मंथन या आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या पुरस्काराने सेव्ह द बेबी गर्ल उपक्रमाला गौरविण्यात आले. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत हा उपक्रम राबविण्याचे जाहीर करण्यात आले. आज नांदेड, सांगली, परभणी, मुंबई, पुणे, नाशिक या जिल्ह्यांनी सेव्ह द बेबी गर्ल हा उपक्रम सुरू केला आहे. आज दोन वर्षांनंतर जेव्हा या उपक्रमाचे यश दृष्टिक्षेपात येऊ लागले आहे, तेव्हा एक गोष्ट मनात येऊन जाते ती म्हणजे, देशमुख साहेबांचा लढा हा केवळ प्रतिगामी मानसिकतेविरुद्ध नव्हता तर तो पुढील २० वर्षांनंतर येऊ घातलेल्या जैविक असमतोलाविरुद्धचा होता. मुलींची संख्या मुलांच्या तुलनेत कमालीची घटू लागली तर २० वर्षांनंतर तमाम मानव जातीवर जैविक असमतोलाचे येणारे संकट किती भयावह असेल याचा अंदाजच बांधलेला बरा. दरहजार मुलांमागे जर मुलींची संख्या ६५० पर्यंत घसरली तर समाजाचे अस्तित्व कसे असेल? केवळ दूरदृष्टी असलेला माणूसच भविष्याचा वेध घेत असतो. देशमुख साहेबांना दूरदृष्टी लाभली आहे. आज देशभर या उपक्रमाचे अनुकरण करण्याचा विचार सुरू

आहे. उद्या संपूर्ण देशात सेव्ह द बेबी गर्ल हा उपक्रम सुरू होईल, अर्थात याचे सर्व श्रेय लक्ष्मीकांत देशमुख यांनाच द्यावे लागेल.

### संवेदनशील प्रशासक

प्रशासन हे रूक्ष असते. शासन निर्णय, नियम-अधिनियम, परिपत्रक, टिप्पणी या शब्दांच्या परिघाभोवती फिरणारी यंत्रणा म्हणजे शासन असे म्हटले जाते. फाईल फिरते आहे म्हणून ती जिवंत आहे असेही उपरोधाने म्हटले जाते. माझ्या मते प्रशासन हे कधीच रूक्ष नसते, ते आनंददायी असते. जसे माणसाच्या जीवनात चढउतार असतात तसे काही प्रसंग प्रशासनातही अनुभवावयास मिळतात, म्हणून संपूर्ण यंत्रणा वाईट होत नाही. फाईल कल्चरमध्ये अडकलेली यंत्रणा जर जिवंत करायची असेल तर संवेदना असलेला व जाणिवा जपणारा माणूस हवा असतो. जिल्हाधिकारी देशमुख हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. मध्यंतरीच्या काळात संजय शिवाजी कोपार्डे या शेतकऱ्याचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला. त्याचे कुटुंब एका क्षणात रस्त्यावर आले. जिल्हाधिकारी देशमुख यांना ही घटना जेव्हा कळते तेव्हा २४ तासांच्या आत कोपार्डे कुटुंबीयांस मदत मिळाली पाहिजे असे आदेश ते देतात, काही तासांतच मदतीचा १ लाखाचा धनादेश तयार होतो. लगोलग जिल्हाधिकारी कोपार्डे कुटुंबीयांचे घर गाठतात. त्यांचे सांत्वन करताना ते खूप भावनाविवश होतात. संजय कोपार्डे यांच्या दोन्ही मुलांना पोटाशी धरतात, त्यांना मायेची ऊब देतात. जिल्हाधिकाऱ्यांचे आपुलकीचे व आपलेपणाचे शब्द ऐकून संजय कोपार्डेचे वडील जिल्हाधिकाऱ्यांचे पाय धरतात. त्यांना मध्येच अडवत देशमुख साहेब म्हणतात, मी तुमच्या मुलासारखा आहे. तुम्ही आमच्या वडिलांसमान आहात. असे बोलताना त्यांचा कंठ दाटून येतो. कोपार्डे कुटुंबीयांना १ लाखाच्या धनादेशाची कार्यवाही पूर्ण होण्यासाठी पंचनामा, अहवाल, टिप्पणी मग पुढील कारवाई अशा प्रक्रिया पार पाडण्यास खूप वेळ लागला असता; परंतु संवेदनशील प्रशासक कशा पद्धतीने सामान्यांना दिलासा देऊ शकतो हे वरील उदाहरणावरून स्पष्ट होते. जिल्ह्यात बॉक्साईट वाहतुकीमुळे दोन कर्त्या व्यक्तींचे प्राण गेले. त्या वेळी देशमुख साहेबांनी बॉक्साईट कंपनीवर दबाव टाकून प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत त्या कुटुंबीयांना मिळवून दिली होती. त्यांना कार्यालयात भेटायला येणारा प्रत्येक माणूस चेहऱ्यावर हास्य घेऊन परततो. आपल्या कामास वेळ जरूर लागेल, परंतु या माणसाकडून आपणास न्याय मिळेल अशी भावना सर्वसामान्य नागरिकांची बनली आहे.

स्वयम् ही मतिमंद मुलांची शाळा कोल्हापुरात आहे. न्याय संकुलाच्या जागेत ती पूर्वी भरत असे. न्याय संकुलाचे काम सुरू झाल्यानंतर अपंग व मतिमंद मुलांना दुसरीकडे सहारा घ्यावा लागला. त्यांना हक्काची जागा व इमारत नव्हती. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना जागा तर दिलीच शिवाय इमारतीसाठी निधी संकलन करण्याचे कामही सुरू केले. २ कोटी रुपयांची नवी वास्तू अपंग व मतिमंद मुलांना आता मिळणार आहे. १५ ऑगस्टला तिचे भूमिपूजनही जिल्हाधिकाऱ्यांनी घडवून आणले. अनाथ मुलांसाठी असलेल्या बाल संकुलाची सध्याची इमारत जुनी झाली आहे. त्यांनाही नवी इमारत बांधून देण्यासाठी सामाजिक भावनेने जिल्हाधिकाऱ्यांनी दानशूर व्यक्तींना मदतीचे आवाहन केले आहे. ३ कोटी रुपयांच्या इमारतीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. लवकरच या इमारतीचे काम जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने सुरू होईल. कोल्हापूर शहराचे सांस्कृतिक अधिष्ठान असलेले शाहू स्मारक आता अधिक सुसज्ज व सर्व सोयींनी युक्त असे बनले आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जन्मस्थळ विकासाचे कामही मार्गी लागले आहे. १० कोटी रुपयांचा निधी शाहू जन्मस्थळासाठी मिळवून घेण्यात देशमुखांनी अपार मेहनत घेतली. माणगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक व्हावे यासाठी त्यांनी स्वत: पुढाकार घेतला. मंत्र्यांसमोर त्याचे सादरीकरण केले व ५ कोटी रुपयांचा निधीही मंजूर करून घेतला. मराठी चित्रपटाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे बाबुराव पेंटर यांचे उचित स्मारक कोल्हापुरात व्हावे यासाठी त्यांनी पाठपुरावा सुरू केला आहे. या स्मारकासाठी त्यांनी १५ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

१० फेब्रुवारी २००९ रोजी लक्ष्मीकांत देशमुख यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी पदाची सूत्रे हाती घेतली. पहिल्याच दिवशी त्यांनी पत्रकारांशी अनौपचारिक वार्तालाप केला. तुमच्या कामाची दिशा काय असेल? पत्रकाराने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, 'मी मुळातच माणसं वाचणारा माणूस आहे. प्रशासन पारदर्शी, जबाबदेही आणि लोकाभिमुख करणे हे माझे कर्तव्य आहे. प्रशासन गतिमान करण्यासाठी हायटेक कर्मचारी-अधिकारी ही संकल्पना मी जिल्ह्यात राबविणार आहे. लोकांची कामे वेळेत व विनाकष्ट व्हायची असतील तर तंत्रज्ञानाचा अवलंब अपरिहार्य आहे. त्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले जातील.' आज दोन वर्षांचा कालावधी होतो आहे. गेल्या दोन वर्षांत कोल्हापूर जिल्हा हायटेक झाला आहे, प्रत्येक तलाठी आता लॅपटॉपधारी झाला आहे. संगणकीकृत दाखले गावातच मिळू लागले आहेत. ई-चावडी हा उपक्रम यशस्वी होऊ लागला

आहे. महा-ई-सेवा केंद्रांचे जाळे जिल्हाभर पसरू लागले आहे. आपत्ती व्यवस्थापनामध्ये 'एम-डिझास्टर' हा उपक्रम यशस्वी ठरला आहे. अन्नधान्य वितरण व्यवस्थेत आमूलाग्र बदल झाला आहे. एम-डिस्ट्रीब्यूशन आणि व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टिम (व्हीटीएस) कार्यान्वित करण्याचा पहिला प्रयत्न झाला तो कोल्हापुरात. गावपातळीवर अन्नधान्य वितरण आता सुलभ झाले आहे. जिल्ह्यातील बाराही तालुके व्हीडिओ कॉन्फरन्सिंग आणि एसएमएस ब्लास्टरद्वारे जोडल्यामुळे योग्य समन्वय राखला जात आहे. याचा परिणाम म्हणून लोकांच्या तक्रारी कमी झाल्या आहेत. वेळेत धान्य मिळू लागल्यामुळे गोरगरीब जनता सुखावली आहे. काळाबाजार पूर्णत: रोखला गेला आहे. ही सर्व गतिमानता देशमुखांची चिकाटी, प्रामाणिक व जाणीवपूर्वक प्रयत्न यांचे यश आहे. लोकांना प्रशासनाबद्दल आस्था वाटावी या दृष्टीने

**१० फेब्रुवारी २००९ रोजी लक्ष्मीकांत देशमुख यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी पदाची सूत्रे हाती घेतली. पहिल्याच दिवशी त्यांनी पत्रकारांशी अनौपचारिक वार्तालाप केला. तुमच्या कामाची दिशा काय असेल? पत्रकाराने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, 'मी मुळातच माणसं वाचणारा माणूस आहे. प्रशासन पारदर्शी, जबाबदेही आणि लोकाभिमुख करणे हे माझे कर्तव्य आहे. प्रशासन गतिमान करण्यासाठी हायटेक कर्मचारी-अधिकारी ही संकल्पना मी जिल्ह्यात राबविणार आहे. लोकांची कामे वेळेत व विनाकष्ट व्हायची असतील तर तंत्रज्ञानाचा अवलंब अपरिहार्य आहे. त्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले जातील.' आज दोन वर्षांचा कालावधी होतो आहे. गेल्या दोन वर्षांत कोल्हापूर जिल्हा हायटेक झाला आहे, प्रत्येक तलाठी आता लॅपटॉपधारी झाला आहे. संगणकीकृत दाखले गावातच मिळू लागले आहेत. ई-चावडी हा उपक्रम यशस्वी होऊ लागला आहे.**

अनेक अधिकाऱ्यांनी वेळोवेळी विधायक असे काम केले आहे. त्याचे चांगले परिणामही जिल्ह्यात दिसून आले आहेत. निर्मलग्राम चळवळ जिल्ह्यात यशस्वी झाली ती प्रशासनाच्या विधायक भूमिकेमुळेच. आता जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख प्रशासन जनतेप्रती जबाबदेही असले पाहिजे या दृष्टीने ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहेत. आपल्या कामकाज पद्धतीत गतिमानता आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर उपयोगी ठरू शकतो याची जाणीव त्यांना आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्याची वेबसाईट अपडेट तर केलीच शिवाय प्रशासनाचा ब्लॉग सुरू करून जनता आणि प्रशासन यांच्यात संवाद घडून यावा यासाठी पाऊल उचलले आहे. एवढ्यावरच न थांबता त्यांनी जनतेच्या सूचना व तक्रारी ऐकण्यासाठी स्वत:चा ई-मेल जनतेसाठी खुला केला. एखाद्या नागरिकाने जिल्हाधिकाऱ्यांना ई-मेलवरून तक्रार केली तर त्याला ४८ तासांच्या आत ते स्वत: उत्तर देणार आहेत. त्याचबरोबर ई-मेलवरील तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित विभागाच्या शासकीय अधिकाऱ्याला काय सूचना देण्यात आल्या आहेत, याची माहिती त्या नागरिकाला पुरविली जाते.

## व्हिजन कोल्हापूर - २०१५

जिल्ह्याचा २०११ ते २०१५ या पाच वर्षांचा विकासाचा आराखडा राज्यात सर्वप्रथम तयार केला तो कोल्हापूर जिल्ह्याने. जिल्हाधिकारी देशमुख यांनी यासाठी अपार मेहनत घेतली. जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांच्या अनेक बैठका घेतल्या. प्रत्येक विभागाने पुढील पाच वर्षांचे नियोजन करावे अशा सूचना देताना हे नियोजन दूरगामी असले पाहिजे यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांमध्ये ऊर्जा निर्माण केली. पुढील पाच वर्षांत आपल्या कार्यालयास किती निधी मिळेल याचा अंदाज बांधून अनेक कार्यालयांनी वस्तुनिष्ठ व्हिजन डॉक्युमेंट तयार केले. पुस्तकरूपाने ते जनतेसाठी खुले केले. वेळोवेळी प्रत्येक कार्यालयाच्या व्हिजन डॉक्युमेंटचा आढावा घेऊन अधिकाऱ्यांना सातत्याने प्रोत्साहन देण्याचे काम ते करतात. कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या दोन वर्षांच्या कार्यकाळात जिल्हाधिकारी देशमुख यांनी राबविलेल्या उपक्रमांची यादी खूप मोठी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कोल्हापुरात विभागीय क्रीडा संकुल व्हावे ही मागणी होती. क्रीडा संचालक पद भूषवून कोल्हापूरच्या जिल्हाधिकारी पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर वर्षभरातच विभागीय क्रीडा संकुल मंजूर तर झालेच, शिवाय भरघोस निधीही मिळाला. जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला ऊर्जितावस्था आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. मिशन कोल्हापूर गोल्ड ही नावीन्यपूर्ण योजना सुरू केली. आंतरराष्ट्रीय

स्पर्धेसाठी खेळाडू घडविणारी ही योजना आहे, यासाठी दरवर्षी २५ लाख रुपये जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून त्यांनी मंजूर करवून घेतले. सेव्ह द बेबी गर्ल, एम-डिझास्टर, एम-डिस्ट्रीब्युशन, व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टिम, ई-चावडी, मिशन कोल्हापूर गोल्ड आदी उपक्रम गेल्या वर्षाच्या कार्यकाळात देशमुखांनी सुरू केले. हे सर्व उपक्रम राज्यस्तरावर लागू करण्याचे संकेत राज्य शासनाने दिले आहेत.

कोल्हापुरातील कला, संस्कृती, खाद्य संस्कृती, पर्यटन स्थळे जगभर प्रसिद्ध आहेत. पर्यटनाच्या माध्यमातून पर्यटन वृद्धीबरोबरच रोजगार निर्मितीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी कोल्हापूर महोत्सवाला वेगळा आयाम देण्याचे ठरवले. साहित्य, कलाविष्कार, खाद्य महोत्सव यांच्या पर्वणीबरोबरच कोल्हापुरातील विविध पर्यटन स्थळांना भेटी देणाऱ्या पर्यटकांच्या व्यवस्थेसाठी विशेष पॅकेज देऊ केल्याने देशभरातील हजारो पर्यटकांचे कोल्हापूर हे आवडते टूरिस्ट डेस्टिनेशन ठरू लागले आहे.

जिल्हाधिकारी देशमुख हे मुळात साहित्यिक, त्यामुळे कोल्हापुरात साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी सातत्याने मिळत असते. समाज सांस्कृतिकदृष्ट्या प्रगल्भ झाला पाहिजे यावर देशमुखांची श्रद्धा आहे. त्यांच्या कादंबऱ्या व कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'इन्कलाब विरुद्ध जिहाद' ही त्यांची आंतरराष्ट्रीय दहशतवादावर आधारित कादंबरी खूपच लोकप्रिय झाली. अफगाणिस्तानातील सहा दशकांचा पट या कादंबरीत आहे. त्यांचा 'पाणी-पाणी' हा कथासंग्रह म्हणजे तहानलेल्या महाराष्ट्राची कहाणीच म्हणावी लागेल. या पुस्तकाचे ऑडिओ बुकही लोकप्रिय ठरले आहे. प्रशासनात काम करताना त्यांनी पाहिलेले व अनुभवलेले अनुभव त्यांच्या 'अंधेर नगरी' या पुस्तकात वाचायला मिळतात. प्रचंड वाचन व समोर आलेल्या प्रश्नांची उकल करण्याचे सामर्थ्य देशमुखांच्यात आहे, त्यामुळेच त्यांचे साहित्य वास्तववादी आहे.

सर्वधर्म समाजाच्या उत्कर्षासाठी पावले उचललेल्या राजर्षी शाहू महाराजांच्या जन्मस्थळाच्या नूतनीकरण व विकासाचे काम, आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दरहजारी घटत चाललेल्या मुलींच्या प्रमाणातील त्रुटी दूर करण्यासाठी राबविलेल्या सेव्ह द बेबी गर्ल उपक्रमाचा ध्यास, गरिबांसाठी अन्नधान्य व रॉकेल पुरवठा, खेळाडूंना सोयीसुविधा मिळण्यासाठी क्रीडा संकुल उभारणी, वाटेवर सोडलेल्या अनाथ बालकांसाठी बाल संकुलची अद्ययावत इमारत, अपंग-मतिमंदांच्या शाळा इमारतीची उभारणी, अचानक आपत्तीस सामोरे जाणाऱ्या कुटुंबियांना मायेचा आधार, कोल्हापूर महोत्सवाच्या माध्यमातून पर्यटन वृद्धी तसेच समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शासनाच्या कर्तव्यपूर्तीचे निर्णय घेणारे नियोजन अशी कितीतरी कर्तव्ये बजावत असलेले मन मी देशमुखांच्यात पाहिले आहे. शासनाचा एक जनसंपर्क अधिकारी म्हणून माझा अनेक अधिकाऱ्यांशी संपर्क आला, पण समाजाभिमुख जाणीव असलेले, हळव्या मनाचे संवेदनशील उच्चपदस्थ अधिकारी जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख माझ्या मनात कायमपणे कोरले गेले आहेत, हे सांगायला नको.

**– दयानंद कांबळे**
कोल्हापूर.